# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३,

दूरध्वनी क्रमांक ०२५३-२३०९७००, E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

**प्रेसनोट** दिनांक : २७/०६/२०२३

## जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू अड्ड्यांवर ग्रामीण पोलीसांचे छापे ०६ गुन्हे दाखल, ७८ हजाराचा मुद्देमाल जप्त.

---

अवैध हातभट्टी दारू अड्डयांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी दिनांक २७ जुन २०२४ रोजी ग्रामीण पोलीसांनी जिल्हयातील मालेगाव तालुका व जायखेडा पोलीस ठाण्याचे हद्दीत हातभट्टीच्या दारूची अवैधपणे गाळप करणा-या **एकूण ०६ ठिकाणी एकाच वेळी छापे** टाकून ७० लिटर गावठी दारू, १३६० लिटर रसायन असा एकूण ७८ हजार रुपयांची गावठी दारू, रसायन व इतर साधन सामुग्री जप्त करून संबंधीतांवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्याखाली **०६ गुन्हे दाखल** केले आहेत.

या धाडसत्रात जिल्ह्यातील मालेगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सौदाणे शिवार, दहिवाळ शिवार, येसगाव शिवार व जळकु शिवारातील अशा ०४ ठिकाणी व जायखेडा पोलीस ठाणे हद्दीतील ताहाराबाद शिवारातील ०२ ठिकाणांचा समावेश आहे.

सदर मोहीमेदरम्यान पोलीसांनी अवैध दारू गाळप करणा-या ठिकाणांवर कारवाई केली आहे. जिल्हयातील डोंगर-द-या, नदी-नाल्यांच्या लगत असलेल्या गावांमध्ये गावठी दारू हातभट्टयांवर छापे टाकून पोलीसांनी मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि/राजु सुर्वे यांचे पथकातील पोउपनि/संदिप पाटील, पोहवा/गोरक्षनाथ संवत्सरकर, पोना/शरद मोगल, सुभाष चोपडा, नरेंद्रकुमार कोळी, पोअं/योगेश कोळी, दत्तात्रय माळी व मालेगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोनि/राहुल खताळ यांचे पथकातील मसपोनि/सावंजी, पोउपनि/कोठाळे, पोहवा/पवार, नेरकर, पोना/बच्छाव, वाघ, देवरे, पाटील, भामरे, कुमावत, अहिरे, पोअं/ गुंजाळ, शिरोळे, वाघ, मुंडे, कोळी अशा पथकांनी कामगिरी केलेली आहे.

अवैध व्यवसायासंबंधी नागरिकांनी माहीती द्यावी, माहीती देणा-या इसमाचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी नाल्यातील दुषित पाणी, नवसागर, बॅटरीचे जुने सेल, युरिया यांसह मानवी जीवनास अपायकारक असणा-या रासायनिक पदार्थांचा वापर केला जात असल्याचे आढळून आले असून अशा प्रकारचे गावठी दारू हातभट्टीचे अड्डे आपल्या परिसरात सुरू असल्यास पोलीसांना तात्काळ संपर्क करावा असे आवाहन ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.